# राशिभविष्य - जानेवारी, २०१३.

**दादा दामले (dadadamle@gmail.com )**

**( नवे वर्ष आपणां सर्वांस आरोग्यसंपन्नतेचे , प्रगतीचे, समृद्धीचे आणि सुखशांतिसमाधानाचे जावो, हीच सदिच्छा !)**

=============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात सर्वच बाबतीत अतिशय सावधानतेने व सरळ मार्गाने आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. करण थोड्याशाही चुकीने वा वाममार्गाच्या अवलंबाने जनमानसात असलेल्या आपल्या प्रतिमेस गालबोट लागण्याची शक्यता आहे. जपा. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनात सुखसमाधान मिळण्याची शक्यता दिसत नाही. तसेच या राशीच्या काहींना कुसंगतीचा अनिष्ट परिणाम भोगावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. नोकरदार मंडळीना कामाचा ताण सहन करावा लागेल. शिवाय वरिष्ठ अधिकाऱ्यांशी भांडण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. काहींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मी येईल. सहनशील व्हा व मनावर ताबा ठेवा. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात विपरीत काळ संपून अनुकुल काळाचे लाभ अनुभवू शकाल. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील. वाममार्ग धन सहज मिळू शकणार असेल तरी तो मोह टाळाच. या राशीच्या व्यापार-व्यवसाय असणाऱ्या मंडळींनी आर्थिक व्यवहार जपून करावेत. आर्थिक चिंता निर्माण होणे संभवते. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याच्या उत्तरार्धात अर्थलाभ होईल; पण स्वतंत्र व्यवसाय असणारांना मात्र आर्थिक समस्या भेडसावण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सामान्य नोकरी असणाऱ्या मंडळीना कठोर कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होण्यासाठी प्रयत्न करावा लागेल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना मौल्यवान वस्तूचा लाभ होण्याची शक्यता आहे. पण मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. वाहने जपून चालवा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व त्या त्या वेळेपुरते सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या पूर्वार्धात नको ते विचार सतत मनस्ताप देतील. वाममार्गाने धनप्राप्ती करून घेण्याचा मोह अनावरहोईल. पण मनाला ब्रेक लावून मोहाला तेथल्यातेथेच गाडून टाका. दांपत्यजीवनातही विविध कारणांनी अपेक्षाभंग होणे संभवते. जपा. दिनांक ५-६ या दोन दिवशी विशेष करून नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच वातविकारांचा

त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा. नोकरी कोणत्याही प्रकारची असो, या राशीच्या नोकरदार मंडळीना विरोध, वरिष्ठांशी मतभेद, मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना यांच्याशी मुकाबला करतच काळ व्यतीत करावा लागेल. त्यामुळे सर्व प्रकारचे अनारोग्य होणेही संभवते. जपा. शक्यतो प्रवास करू नका. मनस्ताप होण्याची शक्यता आहे. लोखंड, कोळसा व्यापारी, वकिली, सल्लागारी व्यवसाय, द्रव पदार्थांचे व्यापारी, मनोविकारतज्ञ अशा मंडळीना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण इतर व्यापार-व्यवसाय असणारांना मात्र अनिश्चित परिस्थिती सहन करीतच काळ व्यतीत करावा लागेल. विशेष करून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कामाचा ताण व असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. वाहने सावधानतेनेच चालवा. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात अपघात भय आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात स्वभाव लहरी, चंचल व विक्षिप्त होणे संभवते. मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. जन्मकुंडलीत योग असेल तर शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने काही मंडळीना भूमिलाभ, काहीना धनलाभ तर काहीना मान-प्रतिष्ठा प्राप्त होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-शनि हे दादा ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी सतत मनस्तापच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्याचा सर्व प्रकारचे आरोग्यावर परिणाम होणे शक्य आहे. काही जणांना उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. काहींना शारीरिक-मानसिक कष्ट, काहींना मूळव्याध, काहींना ताप, अपचन, पोटाचे विकार, मूत्राशयविकार अशापैकी अनारोग्याचा त्रास होईल जपा. शिवाय अपघातभय असून जल व वीज भयही संभवते. पतिपत्नीत वाद, भांडणे, किंवा जीवनसाथीचे अनारोग्य, मुलांपैकी कोणाचे आजारपण अशापैकी कारणांनी दांपत्यजीवनात व कौटुंबिक सुखात बाधा येणेही शक्य दिसते. अशा परिस्थितीत कुसंगतीची बाधा झाली तर धननाश होण्यास वेळ लागणार नाही. जपा. पण या राशीच्या ज्या मंडळीना अध्यात्मात रस आहे अशा मंडळीना काळ अनुकुल असून उपासनेद्वारे अध्यात्मप्रगती साधणे शक्य होईल. सूचक स्वप्ने पडतील. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात प्रवास शक्यतो टाळाच. प्रवासात त्रास, मनस्ताप होण्याची शक्यता दिसते. विविध कारणांनी अपेक्षित संततिसुख लाभण्याची शक्यता नाही. चिकित्सक संशोधनात्मक बौद्धिक व्यवसाय, वकिली-सल्लागारी, दलाली असे व्यवसाय असणारांना काल अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. लहरी स्वभाव, आळस व निरुत्साह झटकून मनापासून अभ्यास केल्यास या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती साधणे शक्य होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल, श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज न चुकता बावन्न श्लोकी

गुरुचरित्राचे पठण करा.

**(४) कर्क -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीना अपेक्षित असे कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळण्याची शक्यता दिसत नाही. गैरसमज, वाद, स्थावरसंबंधी समस्या, मतभेद अशा विविध कारणांनी मनस्ताप होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात संततीसंबंधी समस्या त्रस्त करतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल असणार आहे. महिन्याच्या उत्तरार्धात आरोग्यविषयक समस्यांशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता दिसते. पोटविकार, मूत्राशयविकार, अपचन, ताप येणे अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. जपा. दांपत्यजीवनातही पतिपत्नीमध्ये वाद होऊन स्वत:स नैराश्य येणे, कसल्या तरी चिंतेने मन अस्वस्थ होणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी कोणत्याही कारणाने भागीदारात संशयाची परिस्थिती निर्माण होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात उष्णताविकार बळावतील. नोकरी-व्यवसायात कष्ट-परिश्रमामुळे थकवा येईल. शिवाय विषभय, जलभय आहेच. जपा. दलाली वा कमिशन व्यवसाय, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन व्यवसाय असणारांना काळ अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाचे तर काहीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने बौद्धिक कार्यक्षेत्र असणाऱ्या मंडळींपैकी या राशीच्या कर्तृत्वसंपन्न मंडळीना धन-मान-प्रतिष्ठा अशापैकी कशाचा तरी लाभ होईलसे दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल; पण सर्वांगीण आरोग्य उत्तम राखून मनापासून अभ्यास करणे जमले पाहिजे. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल; तर या राशीच्या वकिली-सल्लागरी, हिशेब, शास्त्रीय संशोधन अशा प्रकारचे बौद्धिक व्यवसाय करत असणारांना तसेच यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषध विक्रेते, वैद्यकीय संशोधन, कलात्मक व्यापार-व्यवसाय असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. असे असले तरी या राशीच्या सर्वांनीच महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखले पाहिजे व सतत सावधानतेने आचरण केले पाहिजे. नोकरदार मंडळीनी वरिष्ठांच्या विरोधाला संयमाने तोंड दिले पाहिजे. प्रिय जनांच्या दूरत्वामुळे मन अस्वस्थ राहील. तसेच संततिसुखातही विविध कारणांनी महिन्याच्या पूर्वार्धात बाधा येणे शक्य आहे. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल व काही मनोनुकुल घटना घडतील. आरोग्य सुधारेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात दांपत्यजीवनात दोघांतील मतभेद किंवा जीवनसाथीच्या आरोग्य-

समस्येमुळे मन अस्वस्थ होईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघातभय आहे. जपा. या राशीच्या काही कर्तृत्वसंपन्न मंडळीना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. किंवा काहीना मानाचे स्थान, प्रतिष्ठा असे काही लाभण्याची शक्यताही नाकारता येत नाही. श्रद्धा असेल तर गणेश उपासना अनुकुल होईल. दररोज हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ कौटुंबिक सुखाचे दृष्टीने तापदायक जाण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात तर त्यात अधिक भरच पडण्याची दाट शक्यता आहे. जपा. कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, आर्थिक चिंता निर्माण होणे, कोर्ट प्रकरणांचा त्रास होणे, शारीरिक-मानसिक कष्ट होणे, भावाभावात वितुष्ट येणे, हाती घेतलेल्या कार्यास विलंब होणे, अकारण खर्च वाढणे अशापैकी त्रास होणे संभवते. त्यामुळे सर्व प्रकारचे अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा.मनावर संयम ठेवून आचरण करा; नाही तर अपघात होणेही शक्य आहे. जपा. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. काही जवळच्या नातेवाईकांशी दूरत्व येणेही संभवते. संततिसुखाचे दृष्टीनेही काळ तापदायक होण्याचीच शक्यता आहे. मुलांपैकी कोणाचे आजार तर कोणाचे विक्षिप्त आचरण यांमुळे वैताग येईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या काही मंडळीना उष्णता विकारांचा त्रास होणे संभवते. ताप येणे, इजा होणे, फ़ोड येणे, काहीना त्वचारोगाचा तर काहीना मुखदंतरोगाचा त्रास सहन करावा लागेल. काहीना अपप्रचाराचा त्रास होणेही शक्य आहे. . हृदयविकार असणारांनी मन व बुद्धी शांत राखण्याचा प्रयत्न करावा. नपेक्षा आजार बळावण्याची शक्यताच निर्माण होईल. चोरी, फ़सवणूक यांमुळे आर्थिक हानी होणे संभवते. जपा. काही मंडळीना उगीचच आपल्याला काही तरी आजार झाला असल्याची भावना होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे दांपत्यजीवनात वाद, मतभेद, भांडणे होण्याची शक्यता वाटते.. जीवनसाथीचे आचरण लहरी व विक्षिप्त होईल. पण बुध-गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व विपरीत काळ सुसह्य होईल. शनी ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे. म्हणून श्रद्धेने शिवोपासना, करा व हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमित पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल होईल. या राशीच्या काही कर्तृत्वसंपन्न मंडळीना बढती मिळेल; तर काही मंडळीना मानाचे स्थान वा प्रतिष्ठा प्राप्त होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक लाभ होईल. काही मंडळीना धनलाभ किंवा भूमिलाभ होणेही संभवते. पण छुप्या शत्रूंपासून सावध राहा. महिन्याच्या उत्तरार्धात गैरसमज, भांडणतंटे, असमाधानकारक घटना, राहत्या जागेसंबंधी समस्या, स्थावरसंबंधी वाद अशापैकी कारणांनी

कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागून काही मंडळींचे शारीरिक आरोग्यही बिघडण्याची शक्यता आहे. काहींना रक्तविकार, काहींना त्वचारोग, तर काहींना मुख-दंत रोगाचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट सतत ध्यानात ठेवून सतत मन शांत ठेवून सहनशीलतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मुलांचे आजारपण किंवा अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय भावनाशील झाले असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तरी लगेच नैराश्य येत असावे. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे सहज शक्य होईल. तसेच ज्यांना गूढ संशोधनात रस आहे त्यांना संशोधनात प्रगती करण्यास महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होईल. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही भाग्यवंतांना अचानक धनलाभ किंवा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. तसेच दररोज मनापासून हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल असणार आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना विविध प्रकारचे लाभ होतील. धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल. वरिष्ठ अधिकारी कामाचे कौतुक करतील. या राशीच्या कर्तृत्वसंपन्न मंडळींपैकी काहीना बढती, काहींना उच्च पद, काहींना मानाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात वाढता खर्च होणे संभवते. तसेच फ़सवणुकीमुळे आर्थिक नुकसान होणेही शक्य आहे. जपा. आप्तेष्टांशी पटणार नाही. भांडणे होतील. जपा. मनस्तापामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळ्याचे आजार होण्याची दाट शक्यता दिसते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कौटुंबिक कटकटी, गैरसमज, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. जपा. दांपत्यजीवनातही विविध कारणांनी सुखसमाधान लाभेलच असे सांगता येत नाही. त्यामुळे काही मंडळीना वैराग्य येणे शक्य आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल असला तरी काही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. प्रेमप्रकरणे असतील तर ती यशस्वी होतील व विवाहेच्छूंचे विवाह ठरतील वा संपन्न होतील. तसेच नवे स्नेहसंबंध जुळून येणेही संभवते.. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकला. आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वकच करा. दिनांक ७ व ८ या दोन दिवशी असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल

होईल. शिवाय हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात सर्व प्रकारच्या आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक होईल. मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना व आर्थिक समस्या त्रस्त करतील. अशा परिस्थितीत हृदयविकार व रक्तदाब असणारांनी मन व बुद्धी अगदी शांत ठेवावी व संयमाने वागून सहनशील व्हावे. तरच प्रतिकुल काळाशी मुकाबला करू शकाल. रवि-मंगळामुळे उष्णताविकारांचा त्रास होईलसे दिसते. काही मंडळीना अपेक्षित आर्थिक प्राप्तीसाठी अपार कष्ट करावे लागतील. त्यामुळे थकवा येणे संभवते. काही मंडळीना डोळ्याच्या दुखण्याचा त्रास सहन करावा लागेल. काहींना उष्णता भडकून मान अवघडणे, घसा, दात, दाढा दुखणे अशापैकी आजार सहन करावा लागेल. अशा परिस्थितीत गुरु-केतूच्या अनुकुलतेमुळे अनारोग्यावर मात करणे शक्य होईल. तक्रार न करता आहे त्या परिस्थितीत समाधान मानून काळ व्यतीत करू शकलात तरच सुखाचे होईल व गृहसौख्य लाभेल. अध्यात्मात रस असेल तरच उपासनेद्वारे मानसिक शांती लाभू शकेल. गूढ विद्येत संशोधनाची ओढ असणारांना काळ अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मनाला उभारी येईल आणि नव्या उत्साहाने स्वप्नपूर्तीचा प्रयत्न कराल. राहूमुळे महिन्याच्या पूर्वार्धात संततिसुखात बाधा येणे संभवते; तर उत्तरार्धात दांपत्यजीवनात बाधा येणे संभवते. जपा. पण हाच राहू वाममार्ग धनासाठी प्रोत्साहित करील व जुगाराचा अवलंब करण्यास उद्युक्त करेल. जपा. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ असह्य मनस्ताप देणारा आणि अनारोग्यकारक असल्याचाच अनुभव येणार आहे. सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळे मन अस्वस्थ होईल व गहरे नैराश्य येईल. स्वभाव अहंकारी, हेकट व मानापमान फ़ार असणारा असा झाला असल्याने शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार होतील. डोळे तळावतील, मान, घसा, दात यांचे दुखणे त्रस्त करीलसे दिसते. श्रम व दगदग फ़ार झाल्यामुळे थकवा येईल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर मन अगदी शांत ठेवून संयम आणि सहनशीलतेचे आचरण केले पाहिजे. तरच होणारा मनस्ताप सुसह्य होईल. आर्थिक समस्या त्रस्त करतील. पण गुरु-शुक्र व राहू-केतु यांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. उच्च बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना तसेच वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, कोळसा, लोखंड यांचा व्यापार असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना बढती, अधिकारपद असे काही मिळू शकेल. सामान्य नोकरी-व्यवसाय करत असणारांना मात्र कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित आर्थिक कमाई

होण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. महिन्याच्या उत्तरार्धात आपल्या स्वाभाविक दोषांमुळे व कोणाशी न पटवून घेण्याच्या अहंकारी स्वभावामुळेच कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळण्यात अडथळे निर्माण होतील. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल; पण सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखून मनापासून अध्ययन करणे जमले पाहिजे. मुलांपैकी कोणाचे आजारपण किंवा विक्षिप्त आचरण अशापैकी कारणाने अपेक्षित संततिसुख लभेलच असे सांगता येणार नाही. श्रीगुरुदेवदत्त व श्रीगणेश यांची उपासना अनुकुल होईल.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा केवळ पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल व जराही थोडे मनाविरुद्ध झाले तरी गहरे नैराश्य येणारे असे झाले असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत महिन्याच्या उत्तरार्धात मात्र सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडत असल्याचा अनुभव येईल व मनावरील ताबा सुटून स्वभाव अस्थिर व विक्षिप्त होईल. जिभेला लगाम घालता आला नाही तर अकारण इतरांचा आपल्या फ़टकळ बोलण्यामुळे अपमान होणे संभवते. जपा. शासकीय व निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, पगारवाढ मिळू शकेल. या राशीच्या काही कर्तृत्वसंपन्न मंडळीना अधिकारपद, उच्च पद असे काही मिळू शकेल. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय करत असणारांनाही महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होईल. या राशीच्या मंडळींनी मनापासून आध्यात्मिक उपासना केली तर होणारा मनस्ताप सुसह्य होईल. महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात घरात भांडणे, वाद होतील; नातेवाईक मंडळींकडून मनस्ताप दिला जाईल व त्यामुळे घरीदारी कोठेच सुखसमाधान व शांती लाभणार नाही. अशा परिस्थितीत बुध-शुक्र ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होणार असल्यानेच अधिक मनस्ताप होणार आहे. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात स्वभाव हट्टी, हेकट व जबर अहंकारी होईल व त्यामुळेच शरीरपीडा, श्रम व दगदग सहन करावी लागून शारीरिक आरोग्य बिघडू शकेल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल व लहरी असा झाला असण्याची दाट शक्यता वाटते. असे असेल तर कोणाचा धाक, उपदेश, समजही असह्य होत असेल. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड व व्रात्य झाली असण्याची शक्यता वाटते. या राशीच्या काही मंडळीना तर मानसिक व्यग्रता किंवा गहरे नैराश्य आले असावे, असे वाटते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तर मंगळामुळे असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होणार असून इच्छाआकांक्षा पूर्ण करणारा असल्याचा अनुभव येईल. बढती,

पगारवाढ होणे संभवते. काही मंडळीना थोरामोठ्यांच्या ओळखीतून अपेक्षित लाभ होतील. या राशीच्या कर्तृत्वसंपन्न मंडळीना बढती, उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळू शकेल. व्यापार-व्यवसाय करत असणाऱ्या या राशीच्या मंडळीना काळ प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल.या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या साहित्यिकांना त्यांचे नवे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होत असल्याचा आनंद मिळेल. पण कला क्षेत्रातील मंडळीना अडचणी व मनस्ताप सहन करतच वाटचाल करावी लागेल. महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. छोट्या-मोठ्या प्रवासाचे योग येतील. अध्यात्मात रस असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मन व बुद्धी सशक्त राहील व होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनिमुळे मन अस्वस्थ राहील व अति विचारामुळे शारीरिक आरोग्य बिघडण्याची शक्यताही जाणवते. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनापासून  करा व हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमित पठण करा.

=====ooooo=====